पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार दि.२४/४/२०१९** रोजी दुपारी ३:०५ (तीन वाजून पाच मिनिटे) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १६**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालय अधिनस्त सिंहगड रोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/२/२०१९ ते दि.२८/२/२०१९ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप ३/०८ दि.११/४/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १७**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६ मार्च २०१९ ते दि.३१ मार्च २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि–१/०९ दि.११/४/२०१९ चे पत्र.

**ठरावान्वये आलेले अभिप्राय**

**विषय क्र. १८**

पुणे मनपाच्या सर्व उद्यानांमधील कोठीमध्ये वास्तव्यास असलेल्या पुणे मनपाच्या सेवकांच्या वेतनातून घरभाड्याची कपात करु नये याबाबत मा.आबा बागुल यांचे दि. ९/१/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१२२ दि. १६/१/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था–४/१४ दि.१६/४/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**संकिर्ण**

**विषय क्र. १९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३ व ३७६ नुसार मशिनरी परमिट व साठा परवाना शुल्कामध्ये वाढ करणे व उक्त नियमाचे कक्षेत असलेले मात्र परवानगी न घेतलेले नविन व्यवसायांना शुल्क आकारणी करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आकाशचिन्ह परवाना/१३ दि.१६/४/२०१९ चे पत्र.

१) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्त्यात नमुद दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित दरवाढ मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतर येणाऱ्या चालू आर्थिक वर्षापासून लागू करणेस

२) पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरु असलेले, मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३ व ३७६ नुसार पुणे महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक असतानाही, परवानगी न घेतलेल्या सर्व व्यवसाय/उद्योगधंद्याना व्यवसायाचे शॉप ॲक्टचे दिनांकापासून जुन्या दराने व प्रस्तावित दरवाढ लागू झालेनंतर नविन दराने शुल्क आकारणी करणेस.

**नगरसचिव,**

**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**